Estd. 1962
'A ++' Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

कोव्हिड -१९ च्या पार्श्वभूमीवर विविध शुल्कामध्ये विद्यार्थ्यांना सवलत देण्यासंदर्भात उच्च व तंत्रशिक्षण विभाग , महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्या पत्र क्रं . बैठक -२०२१ / प्र. क्र. १३७ /विशि-३ दिनांक ३० जून,२०२१ च्या संदर्भाने व्यवस्थापन परिषदेच्या झालेल्या ठरावास अनुसरून आदेशान्वये कळविण्यात येते की, खाली नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी .

१. **सन २०१९-२० मधील उन्हाळी सत्र मार्च २०२० च्या ऑक्टो / नोव्हे. २०२० मध्ये आयोजित परीक्षांमध्ये carry forward पद्धतीने निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत अशा विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रमाचे २०% परीक्षा शुल्क महाविद्यालय / अधिविभाग/ विद्यापीठामार्फत विद्यार्थ्यांना परत करावयाचे असून याबाबत प्रस्ताव पूरक कागदपत्रासह संबंधित परीक्षा विभागाकडे स्वतंत्रपणे सादर करण्यात यावेत .**

२. **सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाबाबत अनुदानित महाविद्यालये व विद्यापीठ अधिविभागातील सर्व अभ्यासक्रमांसाठी आकारण्यात येणाऱ्या इतर शुल्कांमधील जिमखाना शुल्क , विविध गुणदर्शन / उपक्रम शुल्क , कॉलेज मॅगझीन शुल्क , संगणक शुल्क , क्रीडा निधी , वैद्यकीय मदत निधी आणि युथ फेस्टिवल अशा ज्या बाबींवर कोणत्याही प्रकारे खर्च करण्यात आलेला नाही त्या बाबींसाठी आकारण्यात येणारे शुल्क पूर्णपणे माफ करण्यात यावे.**

३. **प्रयोगशाळा व ग्रंथालय यांची देखभाल व ग्रंथालयामध्ये ई - कन्टेंट विकत घेण्यासाठी खर्च करण्यात आला असल्याने याबाबतच्या शुल्कामध्ये ५० % सवलत देण्यात यावी .**

४. **विद्यार्थ्यांद्वारे वसतिगृहाचा उपयोग करण्यात येत नसल्याने वसतिगृह शुल्कापोटी आकारण्यात येणारे शुल्क पूर्णपणे माफ करण्यात यावे .**

५. **विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित महाविद्यालयांत देखील इतर शुल्कांमधील जिमखाना शुल्क , विविध गुणदर्शन / उपक्रम शुल्क , कॉलेज मॅगझीन शुल्क , संगणक शुल्क , क्रीडा निधी , वैद्यकीय मदत निधी आणि युथ फेस्टिवल अशा ज्या बाबींवर कोणत्याही प्रकारे खर्च करण्यात आलेला नाही त्या बाबींसाठी आकारण्यात येणारे शुल्क पूर्णपणे माफ करण्यात यावे. त्याचप्रमाणे प्रयोगशाळा व ग्रंथालय शुल्क यामध्ये ५० % सवलत देण्यात यावी .**

६. **शैक्षणिक वर्ष २०२१ - २२ मध्ये जे विद्यार्थी पुढील वर्गात प्रवेशित होणार आहेत त्यांचे परत करावयाचे परीक्षा व शैक्षणिक शुल्क वगळून इतर शुल्काचे उपरोक्त अ. क्र. २,३,४ व ५ मध्ये नमूद केले प्रमाणे समायोजन करण्यात यावे.**

७. **जे विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०२० - २१ मध्ये पदवी , पदव्युत्तर अंतिम वर्ष , अंतिम सत्र परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत त्यांचे देय ठरणारे परीक्षा व शैक्षणिक शुल्क वगळून इतर शुल्क परत करण्यात यावे .**

८ **विद्यार्थ्यांकडे प्रलंबित असलेले शुल्क ३ ते ४ हप्त्यात भरण्याची सवलत देण्यात यावी, तसेच शुल्क थकीत असेल तर परीक्षेचा अर्ज करण्यास अडवू नये, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.**

कुलसचिव

जा.क्र.शिवाजी वि./ऑन परीक्षा/४८

दिनांक ०५/०८/2021

प्रत -

१) मा . विभागप्रमुख /संचालक /समन्वयक ,पदवी व पदव्युत्तर अधिविभाग , शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर .

२) मा . प्राचार्य / संचालक, सर्व संलग्नीत महाविद्यालये .

३) मा . संचालक , दूर शिक्षण केंद्र , शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर .

४) सर्व उपकुलसचिव , शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर .

५) वित्त व लेखा विभाग , शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर .